# <u>निसर्ग पर्यटन केंद्र वाफे</u>

शहापूर तालुक्यातील माहुली पर्वताच्या कुशीत वसलेले भागदळ हे गाव शहापूर तालूक्याच्या ठिकाणापासून 20 किमी. अंतरावर शहापूर-मुरबाड रस्त्यावर वसलेले असून, गावाचे एकूण भौगोलिक क्षेत्र 451.435 हेक्टर असून त्या गावामध्ये राखीव व संरक्षित वन एकूण 264.925 हेक्टर आहे. सदरचे वनक्षेत्र पूर्वी अवनत झाल्याने गावातील लोकांच्या गरजा, चारा, सरपण, पाणी इ. समस्यांना गावक-यांना तोंड द्यावे लागत होते. सदरच्या गरजा भागविण्यासाठी गावातील लोकंना दुस-या गावाच्या वनक्षेत्रावर विसंबून रहावे लागत होते. महाराष्ट्र शासनाने 16 मार्च 1992 रोजी ग्रामिणांच्या सहभागातून वनव्यवस्थापन करण्याबाबतचा महत्त्वकांक्षी निर्णय घेतला होता. त्या निर्णयाची माहिती लोकांना व्हावी , वनसंरक्षणामध्ये लोकसहभाग वाढावा या उद्देशाने निर्णयाच्या प्रती या विभागातील प्रत्येक गावातील ग्रामस्थांना स्थानिक कर्मचा-यांच्या मार्फत देऊन जनजागृती करण्याचे अभियान सन 1991- 92 पासून ठाणे जिल्हयात व शहापूर वनविभागात सुरु झाले.

सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने शहापूर तालूक्यातील भागदळ गावातील ग्रामस्थांनी उत्स्फुरतपणे सदर निर्णयाचे स्वागत करुन वनसंपदेचे रक्षण करण्यासाठी वनकर्मचा-यांना सहकार्य करण्यास पुढाकार घेतला .त्यामध्ये भागदळ गावातील जेष्ठ नागरीक श्री. काशिनाथ भाकरे व इतर मंडळी सदर गावातील एकूण 88 कुटुंबातील सदस्यांना एकत्र करुन स्थानिक वन अधिकारी यांचेशी संपर्क साधून , 16 मार्च 1992 च्या शासन निर्णयानूसार वनसंरक्षण समिती स्थापन करुन त्यांच्या गावालगत असलेले 268.925 हेक्टर जंगलाचे संरक्षण सर्व गावक-यांनी करावयाचे ठरविले. त्यानंतर वनविभागाशी वेळोवेळी संपर्कात राहून वनसंरक्षण समित्यांच्या व स्थानिक वन अधिकारी यांचे सहकार्याने वनाचे संरक्षण करण्याचे काम सन 1992 पासून सुरु केले.

सन 1992 ते 2014 या वर्षात वरील वनसंरक्षण समितीच्या सभासदांनी हिरीरीने वनाचे संरक्षण करुन जंगलाचे संरक्षण करुन जंगलाचे संरक्षण गावक-यांमार्फत कसे केले जाते याचे नमूने दाखल उत्तम उदाहरण शहापूर तालूक्यातील असलेल्या 88 गावांमधिल लोकांना दाखवून दिले. वेळोवेळी वनकर्मचारी यांनी गावामध्ये सभा घेऊन स्थानिक सभासद व कर्मचारी आपापसात मांडीला मांडी लावून वनाचे संवर्धन व संगोपन करण्याबाबतचा विचार विनीमय करीत असतात. समिती गठित झाल्यानंतर गावासाठी लागणारा चारा- सरपण हे जंगलास इजा न पोहचता स्थानिक वन कर्मचा-यांच्या मार्गदर्शनानूसार वाळून, गळून पडलेले सरपण गोळा करुन गरज भागवत आहेत.

वन संरक्षण समितीच्या सदस्यांनी प्रथमतः स्वताःहून जंगलाचे संरक्षण करुन व बाहेरील लोकांना आपल्या जंगलात येणे बाबत बंदी घातली . त्याचप्रमाणे इतर गावातील लोकांना जनजागृतीव्दारे अवैध कृत्य करण्यापासून परावृत्त केले आहे. सन 1992 ते 2014 या 22 वर्षाच्या काळात भागदळ गावातील जंगलामध्ये एकही वनगुन्हा झालेला नाही.

भागदळ गावाने गावात स्वच्छता, शिक्षण, रस्ते साफसफाई, दुरुस्ती, डांबरीकरण, गटारी बांधणी, स्मशान व्यवस्था, पंचतत्वाची जागृती (चराईबंदी, कुऱ्हाडबंदी, नशाबंदी, नसबंदी व श्रमदान) असे उपक्रम राबविले आहेत.

याचे मुख्य कारण म्हणजे गावांत संयुक्त वन व्यवस्थापन समिती स्थापन करुन ग्रामस्थांमध्ये जन जागृती केल्यामुळेच गावाचा विकास झालेला आहे.त्यामुळेच भागदळ गावास “निर्मल ग्राम पुरस्कार” व

“महात्मा गांधी तंटामुक्त गाव पुरस्कार” प्राप्त झाले आहेत तसेच संत तुकाराम वनग्राम योजना अंतर्गत जिल्हा स्तरावर सन 2013-14 मध्ये दुसरा क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त केला आहे.

संयुक्त वनव्यवस्थापन समिती भागदळ यांचे विविध कामाची व योगदानाची दखल असुन निसर्ग पर्यटन केंद्र वाफे हे संयुक्त वनव्यवस्थापन समिती भागदळ यांस संगोपनासाठी देण्यात आले.सन 2009-10 तेव्हा पासुन निसर्ग पर्यटन केंद्र हे प्रगती पथावर असुन विविध सामाजिक संघटना व विविध स्तरावरील विदयार्थी,राजकीय पक्ष आदींनी मोठयाप्रमाणात भेटी दिल्या आहेत.

शहापूर वनविभागात शहापूर शहरानजिक 1.50 कि.मी अंतरावर वाफा मध्यवर्ती रोपवाटीका सुमारे 12 हेक्टर क्षेत्रात स्थापन करण्यांत आलेले आहे. सदर रोपवाटीकेसाठी 3 हेक्टर क्षेत्र पुरेसे असून उर्वरीत क्षेत्रात सन 2008-09 मध्ये निसर्ग पर्यटन स्थळ विकसीत करण्यांत आलेले आहे.

सदर पर्यटन स्थळांतर्गत अस्तिवात असलेले जुने गोडावून, लेबर शेड, कर्मचाऱ्यांचे निवासस्थान व मोडकळीस आलेल्या इमारतीची दुरुस्ती करुन त्यांचे रुपांतर वनविश्रामगृहामध्ये करण्यांत आलेले आहे.त्यामुळे सद्यपरिस्थतीत वनसंवर्धन 1980 चा भंग होऊ न देता आजमितीस 1 लक्झरी सुट, 1 बांबु हट,1भातसा सुट, 1 AC कुटी व 1 डॉरमेंटरी उभारण्यांत आलेले आहे.तसेच पायडल नौका विहार,व जेटस्की इंजीन बोटी,कयाकिंग अशा प्रकारचे जलक्रिडा व कृत्रिम धबधबा, बालोद्यान इत्यादी पर्यटकांचे मनोरंजनासाठी सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यांत आलेले आहे.

सन 2008-09 पासून आजपर्यंत निसर्ग पर्यटन राज्य योजना व जिल्हा वार्षिक योजना या लेखाशिर्षा अंतर्गत पॅगोडा उभारणे, वॉच टॉवर, अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची दुरुस्ती, जनरेटर खरेदी, पॅडल बोट खरेदी, स्प्रिन्कलर सिस्टीम, बारवेल-1, इलेक्ट्रीक पंप खरेदी, मजुरकुटी, माहिती केंद्र, रस्ते दुरुस्ती, भांडार दुरुस्ती, मोटरबोट खरेदी, स्वच्छतागृह बांधणे, वृक्षाभोवती पार बांधणे, तंबु खरेदी, बायो डायव्हसिटी पार्क, अंतर्गत पायवाटा बनविणे, स्वागत कक्षाचे नुतनीकरण करणे, कुंपन तयार करणे, किचन कंन्टेनर, ओपन जिम, नेचर ट्रेल बांबू हट व कारवी हट अशा प्रकारची कामे करण्यांत आलेली आहेत.

जिल्हा नाविण्यपुर्ण योजनांतर्गत जलक्रिडा (Watersports) साठी जेटस्की, कयाकिंग , बनाना बंपर अशा प्रकारचे साहित्य खरेदी करण्यांत आलेले आहे. जलक्रिडा माहे जुन 2014 पासून सुरु करण्यांत आलेले असून पर्यटकांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद लाभत आहे.

वरीलप्रमाणे निसर्ग पर्यटन केंद्रात सोयी-सुविधा उपलब्ध केल्यामुळे संयुक्त वनव्यवस्थापन समिती भागदळ यांना उत्पन्नाचे स्त्रोत चालू झाले आहे.

प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा विनीयोग भागदळ गावाच्या सामुहिक विकासासाठी करण्यांत येतो. सन 2014 पासून गावात मुलींची संख्या वाढविण्यासाठी “वनकन्या योजना” राबविली जात आहे. या योजनेंतर्गत गावात मुलगी जन्माला आल्यानंतर रुपये 2000/- प्रमाणे आजपर्यंत 3 मुलींना या योजनेचा लाभ देण्यांत आलेला आहे, तसेच सन 2015 पासून या योजनेच्या रक्कमेत रुपये 3000/- इतकी वाढ केली आहे. निव्वळ उत्पन्नातून रु. 2.50 लाख भागदळ गावाला समाजमंदिर बांधण्यासाठी दिले आहेत. या विविध उपक्रमांमुळे वनसंवर्धन व गावाचा सर्वांगिण विकास होणेस मदत झाली आहे.

-----*****-----

## माहुली सुट



## भातसा सुट



# जलक्रिडा (Water Sport)





